क्र.का.4/प्र.क्र.2681/2011/350
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,पुणे1
दिनांक 14/02/2011

**विषय**:- दस्तलेखनिकांच्या परवान्यांचे नुतनीकरणाबाबत.

**संदर्भ:** 1) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.का 4/प्र.क्र.2681/भाग 3/1701 ते 1783, दि.21/06/2001.

2) मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ यांचेकडील रिट पिटीशन क्र.4917/03 (चैतराम चिंधूजी वासनिक विरुध्द महाराष्ट्र शासन) मधील आदेश दि.28/12/06

3) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.का 4/प्र.क्र.2698/2010/2022, दि.20/12/2010

4) कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई] 32 यांचे पत्र क्रमांक: एस-30/2008/प्र.क्र.153/म-1, दिनांक 24/1/2011

**परिपत्रक:-**

या कार्यालयाचे संदर्भ क्र.3 चे परिपत्रकान्वये त्यामध्ये सविस्तररित्या नमूद केलेल्या कारणास्तव, "वयाची 60 वर्षे पूर्ण झालेल्या दस्तलेखनिकांनी जर परवाना नूतनीकरणासाठी अर्ज केले असतील व त्यांचे बाबतीत नूतनीकरणासाठीच्या इतर अटी शर्तीची पूर्तता होत असेल तर त्यांचे परवाने संदर्भ क्र.2 चे न्यायनिणयाबाबत **मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात येणा-या स्पेशल लिव्ह पिटीशनच्या निर्णयाच्या अधीन राहून नूतनीकरण करुन देण्यात यावेत**" अशा सूचना देण्यात आल्या होत्या.

तथापि, सदर प्रकरणी सदंर्भीय पत्र क्रमांक 4 च्या शासन पत्राव्दारे देण्यात आलेल्या अभिप्रायानुसार, प्रस्तुत प्रकरणी, मा. सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लिव्ह पिटीशन दाखल करण्यात

येणार नसल्याने संदर्भिय पत्र क्र.3 अन्वये निर्ग मित केलेल्या परिपत्रकामधील उपरोक्त नमूद सूचनेमधील **मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात येणा-या स्पेशल लिव्ह पिटीशनच्या निर्णयाच्या अधीन राहून** ही बाब वगळण्यात येत असून पुढीलप्रमाणे सुधारित सूचना देण्यात येत आहेत.

वयाची 60 वर्षे पूर्ण झालेल्या दस्तलेखनिकांनी जर परवाना नूतनीकरणासाठी अर्ज केले असतील व त्यांचे बाबतीत नूतनीकरणासाठीच्या इतर अटी शर्तींची पूर्तता होत असेल तर त्यांचे परवाने नूतनीकरण करुन देण्यात यावेत.

सही/-श्री.एस.चोक्कलिंगम

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक.**

**महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**प्रति**:-

1) सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निबंधक
2) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
1) सर्व सह जिल्हा निंबधक
2) सर्व दुय्यम निबंधक (संबंधित सह जिल्हा निंबधक यांचेमार्फत)
3) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय पुणे.

**प्रत**- कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई 32

निर्गमित,

(सही/-श्री.ए. आर.देवगुंडे)

**नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय).**

**महाराष्ट्र राज्य, पुणे.**